RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १३८(४)] शुक्रवार, ऑक्टोबर २६, २०१८/कार्तिक ४, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३९५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ ऑक्टोबर २०१८.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक परिनि.२०१८/प्र.क्र.१०४/विशि-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम ७१ चे पोट-कलम (१२) आणि कलम ७२ चे पोट-कलम (१०) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, विद्यापीठ, महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील विद्यार्थी परिषदेची कार्ये व कर्तव्ये यांच्याशी संबंधित एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

**सन २०१८ चा एकरूप परिनियम क्रमांक ५.**

१. **संक्षिप्त नाव.**— या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यापीठ, महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्था यांमधील विद्यार्थी परिषदेची कार्ये व कर्तव्ये) एकरूप परिनियम, २०१८ असे म्हणावे.

२. **विद्यार्थी परिषदेची कार्ये व कर्तव्ये** –

विद्यार्थी परिषदेची कार्ये व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :–

(१) विद्यार्थ्यांच्या कल्याणाकडे लक्ष देणे;

(२) महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा विद्यापीठ विभाग व विद्यापीठस्तरावर घटित झालेल्या विविध विद्यार्थी संघटना व कला मंडल, जिमखाना समिती, वक्तृत्व व वादविवाद समिती, वाङमय समिती, इत्यादी यांसारख्या समित्या यांच्या अभ्यासेतर उपक्रमांना प्रोत्साहन देणे व समन्वय प्रस्थापित करणे;

(३) विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही दृष्टिकोन, नागरिकत्वाची जाणीव आणि एकतेची भावना वाढीस लावणे;

(४) विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, मानवता आणि राष्ट्रवाद या जाणिवा बिंबवण्यास प्रोत्साहन देणे;

(५) समाजाच्या व राज्याच्या उन्नतीसाठी सौहार्दाची आणि बांधीलकीची भावना वृद्धिंगत करणे;

(६) महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा विद्यापीठाच्या परिसरात विद्यार्थ्यांमध्ये शिस्त वाढीस लावणे व ती अबाधित ठेवणे;

(७) विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि व्यक्तिमत्व विकासाला उत्तेजन देण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे;

(८) आपल्या अधिकारक्षेत्रात विद्यार्थ्यांच्या अडचणी व तक्रारींचे निवारण करण्यासाठी सक्रियपणे सहाय्य करणे;

(९) संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी नवप्रवर्तक विचार व योजना सुचविणे;

(१०) समाजामध्ये विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा परिसंस्था यांच्याप्रती सद्भावना व धारणा वाढीस लावण्यासाठी योगदान देणे;

(११) विद्यापीठ/महाविद्यालय/परिसंस्था यांच्या प्रशासनास, शिस्त, सुरक्षा व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचे प्रश्न यांबाबत योग्य ते उपाय योजण्यासाठी सुचविणे;

(१२) शिक्षणामधील गुणवत्ता उंचावण्यासाठी आणि उत्कृष्टता आणण्यासाठी योग्य त्या उपाययोजना सुचविणे;

(१३) वेगवेगळ्या क्रीडा, सांस्कृतिक व इतर दूरस्थ सेवादायी कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना अधिकाधिक सहभागी होण्यास उत्तेजन देणे;

(१४) विद्यार्थ्यांसाठी मूलभूत सुख-सोयी व सुविधा यांबाबत तरतूद करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणे;

(१५) विविध प्रकारच्या प्रतिसाद (फीड-बॅक) यंत्रणा तयार करण्याच्या व त्या राबविण्याच्या प्रक्रियेत सहाय्य करणे;

(१६) विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करणे;

(१७) विद्यार्थी परिषदेच्या उपक्रमांचा वार्षिक अहवाल तयार करणे व त्याची एक प्रत विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळासह प्राचार्य किंवा संचालक किंवा यथास्थिति प्र-कुलगुरू यांना सादर करणे;

(१८) प्राचार्य किंवा संचालक किंवा यथास्थिति प्र-कुलगुरू यांनी सोपविलेली असतील अशी इतर कार्ये व कर्तव्ये पार पाडणे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. रा. कहार,**
शासनाचे उप सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 26th October 2018.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. PARINI- 2018/C. R. No. 104/VISHI-2.—In exercise of the powers conferred by sub-section (*10*) of section 72 read with sub-section (*12*) of section 71 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act. No. VI of 2017), the Government of Maharashtra hereby, prescribes the uniform Statute, relating to functions and duties of Students' Council in university, colleges and recognized institutions, namely :—

### UNIFORM STATUTE NO. 5 OF 2018.

1. Short title.—This Statute may be called the Maharashtra Public Universities (Functions and Duties of Students' Council in University, Colleges and Recognized Institutions) Uniform Statute, 2018.

2. Functions and duties of the Students' Council—

The Students' Council shall have the following functions and duties, namely :—

(1) to look after the welfare of the students;

(2) to promote and coordinate the extra-curricular activities of different students associations and committees which are constituted at the college and recognized institution or university department and university level, like Art circle, Gymkhana committee, Elocution and Debate committee, Literary committee, etc.;

(3) to promote democratic outlook, civic sense and spirit of oneness amongst students;

(4) to inculcate sense of moral values, humanities and nationalism among students;

(5) to promote sense of belonging and commitment to betterment of society and State;

(6) to promote and maintain discipline among the students on the campus;

(7) to organize various activities for promoting cultural, social and personality development of the students;

(8) to assist proactively in resolving the difficulties and grievances of the students within its jurisdiction;

(9) to suggest innovative ideas and schemes for students' welfare to the respective competent authorities;

(10) to contribute in developing goodwill and perception about the University or college or institution in the society;

(11) to suggest the administration of the University/college/institution about appropriate steps to be taken regarding the discipline, security and safety issues of students;

(12) to suggest appropriate measures for elevating quality and excellence in education;

(13) to promote more participation of students in different events of sports, culture and other outreach programmes;

(14) to strive for provisions of the basic amenities and facilities to the students;

(15) to assist in the process of framing and implementation of different types of feedback mechanisms;

(16) to organize various programmes for the welfare of the students;

(17) to prepare the annual report of the activities of the Students' Council and submit the same to the Principal or Director or Pro-Vice-Chancellor, as the case may be, with a copy to the Board of Students' Development of the University;

(18) to perform such other functions and duties as may be assigned to it by Principal or Director or Pro-Vice-Chancellor, as the case may be.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. R. KAHAR,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.